# परिपत्रक

## जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे

जा.क्र.बी–१६(ii)/संगणक/५१/२०१४ दिनांक २४/०६/२०१४

**विषय** :– सी.आय.एस. प्रणाली अपडेट करणेबाबत....

उपरोक्त विषयांस अनुसरुन जिल्हा न्यायालय, पुणे आवारातील सर्व न्यायालयांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय आवारामध्ये वकिल व पक्षकार यांचेसाठी एस.एम.एस. सुविधा चालू करण्याचे कामकाज प्रगतीपथावर आहे. सदरची सुविधा सुरळीतपणे चालणेसाठी प्रत्येक प्रकरणामध्ये वकिल व पक्षकार यांचे मोबाईल नंबर अपडेट असणे आवश्यक आहे. वकिलांबाबतची माहिती ही संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, पुणे येथे संगणकीकृत करण्यात आलेली आहे.

जिल्हा न्यायालय आवारातील सर्व न्यायालयांनी त्यांचे प्रत्येक प्रकरणांमधील दोन्ही पार्टीज्चे वकिलांची माहिती खाली दिलेल्या सुचनांनुसार अपडेट करावी.
आपल्या न्यायालयास दिलेल्या युझरने लॉगिन करावे.

⇒ लिटीगंट अपडेशन मेनुला क्लिक करणे.

- ⇒ **अपडेट ॲडव्होकेट कोडला** क्लिक करणे.
- ⇒ पॉप–अप मेनूमधून आपले **प्रकरण सिलेक्ट** करा.
- ⇒ त्याखाली आपल्या प्रकरणातील **पार्टीचे नांव** सिलेक्ट करा.
- ⇒ ॲडव्होकेट समोरील **शो ऑल** या बटनावर क्लिक करा.
- ⇒ त्याखालील ॲडव्होकेट समोरील **पॉप–अप मेनूमधुन** संबंधीत ॲडव्होकेट सिलेक्ट करा.
- ⇒ त्यानंतर शेवटी **सबमिट** बटनावर क्लिक करा.

अशा पध्दतीने सर्व प्रकरणांमधील सर्व पार्टीज्चे ॲडव्होकेट अपडेट करावेत जेणेकरुन संबंधीत वकिलांना त्यांचे मोबाईलवरती त्यांचे प्रकरणातील सर्व माहिती एस.एम.एस. द्वारे प्राप्त होईल. सदर कामकाज करताना काही अडचण आल्यास संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, पुणे येथे संपर्क साधुन आपली अडचण निवारण करुन घ्यावी.

तसेच याद्वारे असेही कळविण्यात येते की, काही वकिलांची नावे जर लिस्टमध्ये दिसत नसतील तर अशा वकिलांना संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, पुणे येथे येऊन वकिलांचे माहितीबाबतचा फॉर्म भरुन त्यांची माहिती संगणकीकृत करणेबाबत संबोधीत करावे.

सही/–
(कालिदास ल. वडणे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, पुणे.

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पुणे जिल्हा न्यायालय आवारातील सर्व न्यायाधीशांना अग्रेषीत.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, पुणे.